शीर्षक

वित्तीय समावेशनामध्ये जनधन योजनेचे योगदान एक आर्थिक अभ्यास- (विशेष संदर्भ - मराठवाडा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी.

पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा.

संशोधक

प्रसाद एकनाथराव कदम

एम.ए., सेट (अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.बाभुळगावकर किशन एस.

अर्थशास्त्र विभाग

श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय, वसमत

संशोधन केंद्र - पीपल्स कॉलेज, नांदेड

एप्रिल-2023

वित्तीय समावेशनामध्ये जनधन योजनेचे योगदान

एक आर्थिक अभ्यास- (विशेष संदर्भ - मराठवाडा)

प्रस्तावना :-

अर्थव्यवस्थेतील अनेक क्षेत्रापैकी एक महत्त्वपूर्ण असे क्षेत्र म्हणजे बँकिंग क्षेत्र होय. या क्षेत्रामध्ये विविध प्रकारच्या बँकसेवा देणाऱ्या संस्थाचा समावेश होतो. बँका लोकांकडून ठेवी स्विकारणे गरजूंना कर्ज देणे, लॉकर सुविधा देणे इत्यादी सुविधा पुरवितात. बँका लोकांना बचतीची सवय लावण्याचे काम करतात तसेच लोकांच्या निधीचे व्यवस्थीत, सुरक्षीत हस्तांतरण करण्याचे काम बँका करतात म्हणून अर्थव्यवस्थेत बँकींग क्षेत्र महत्त्वाचे आहे.

भारतात मात्र स्वातंत्र्यापासूनच बँकिंग क्षेत्राचा विकास कमी राहीला आहे. भारताच्या लोकसंख्येचा एक मोठा हिस्सा ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. तसेच त्यांचा प्रमुख व्यवसाय हा शेती आहे. भारतीय शेती व्यवसाय मान्सूनवर अवलंबून असल्याने शेतीच्या उत्पनात अनिश्चितता असते किंवा उत्पन्न हे कमी असते त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांचा उत्पन्नापेक्षा उपभोग खर्च जास्त असल्याने ग्रामीण भागात बचतीचे प्रमाण कमी असते त्यामुळे बँका ग्रामीण भागात व्यवसाय करण्यास तयार नसतात. त्याचाच परिणाम म्हणून ग्रामीण भागातील विशेषत: असंघटीत क्षेत्रातील लोकसंख्येचा मोठा वर्ग हा बँकींगच्या मुलभूत सुविधांपासून वंचित आहे. त्यांना बँकींगच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी वित्तीय समावेशनाची आवश्यकता आहे.

बँक खाते उघडणे, ठेवी स्विकारणे, निधीचे हस्तांतरण करणे, देणी देणे, कर्ज सुविधा, विमा सुविधा, अर्थसाक्षरता करणे इत्यादी बँक विषयक मुलभूत सूविधा उपलब्ध न होण्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत- बँकांचा ग्रामीण भागात विस्तार कमी आहे, लोकांचे अधिवास आणि बँकव्यवसायाचे ठिकाण यातील अंतर जास्त आहे, बँकखाते उघडण्यासाठी लागणारे पैसे, बँक खात्यामध्ये आवश्यक शिल्लक ठेवणे, बँक खाते उघडण्यासाठी लागणारी कागदपत्रे, केवायसी, खातेधारकांच्या ओळख पुरावा, बँक अधिकारी व बँकेचे ग्राहक यांच्यातील सुसंवाद व समन्वयाचा अभाव इत्यादी.

2011 च्या जनगणनेतील अहवालानूसार भारतातील 41.3% कुटूंबापर्यंत बँक सुविधा पोहचलेल्या नाहीत. बँकेच्या मुलभूत सुविधेपासून वंचित असणाऱ्या लोकांना बँकेच्या मुख्यप्रवाहात आणण्यासाठी सरकारी पातळीवर वित्तीय समावेशनाची आवश्यकता आहे.

वित्तीय समावेशन करण्यासाठी शासकीय पातळीवर अनेक संस्थात्मक प्रयत्न करण्यात आले त्यामध्ये भारतीय स्टेट बँकेची स्थापना, बँकव्यवसायाचे राष्ट्रीयीकरण, सहकारी बँकांच्या स्थापनेला प्रोत्साहन, प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना, स्थानिक क्षेत्रिय बँका, देय बँका व लघूवित्त बँकांची स्थापना तसेच वित्तीय समावेशन विषयक समित्यांची स्थापना करण्यात आली त्यामध्ये श्री. रंगराजन समिती, नचिकेत मोर समिती, दिपक मोहंती समिती इत्यादी.

वित्तीय समावेशासाठीच्या योजनांमध्ये जनधन योजना , बँक तुमच्यादारी, बँक स्वाभिमान योजना, अग्रणी बँक योजना इत्यादींचा समावेश होतो.

सर्व समावेशक विकासाच्या धोरणाचा एक महत्वाचा घटक म्हणजे वित्तीय समावेशन आहे. याचा उद्देश हा बँकिंग विषयक सुविधा सर्व घटकापर्यंत पोहचविणे असा आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा मोठा हिस्सा हा असंघटीत स्वरुपाचा असून या क्षेत्रातील लोकांना पुरेशाप्रमाणात वित्तविषयक सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे.

परंतू ग्रामीण भागात बचतीचे कमी प्रमाण, संस्थात्मक वित्तीय संस्थाचा अभाव, अल्पप्रमाणातील अर्थसाक्षरता इत्यादीमुळे कारणांनी दुर्गम खेडी, तांडे, वस्त्या या भागातील लोकांना बँकेच्या मुलभूत सुविधा पोहचलेल्या नाहीत. त्यांना बँकींगच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी वित्तीय समावेशन महत्वाचे आहे.

वित्तीय समावेशन :-

वित्तीय समावेशन म्हणजे देशातील मोठ्याप्रमाणात वंचित व अल्पउत्पन्न गटातील जनतेला कमी खर्चात बँकिंग सेवा उपलब्ध करून देणे होय. तसेच असंघटीत क्षेत्रातील घटकांना बँकेच्या मुख्य प्रवाहात आणने होय.

वित्तीय समावेशनाची सद्यस्थिती :-

वित्तीय समावेशनासाठी पूर्वीपासूनच सरकार व RBI ने विविध पातळ्यावर प्रयत्न केलेले आहेत. ते पुढील प्रमाणे आहेत.

बँकांचे राष्ट्रीयीकरण, शाखा विस्तार, SBI, प्रादेशिक ग्रामीण बँका व सहकारी बँकांची स्थापना, अग्रकृम क्षेत्र कर्जपुरवठा, अग्रणी बँक योजना, स्वंय सहायत्ता गटांना बँकांशी जोडणे इ.

2005-06 मध्ये नोफ्रिल खात्यांची सुविधा उपलब्ध केली 2011 च्या जनगणनेनूसार देशातील एकूण 58.7% कुटूंबांना बँकिंग सेवा उपलब्ध होत्या तर महाराष्ट्रातील बँक सुविधा उपलब्ध असणाऱ्या कुटूंबाचे प्रमाण हे 68.9% एवढे आहे.

देशातील ग्रामीण भागातील बँकसुविधा उपलब्ध असल्याचे प्रमाण मात्र 54.46% म्हणजे 50% पातळीवरच आहे.

वित्तीय समावेशनाच्या काही महत्वाच्या योजना :-

RBI ने वित्तीय समावेशनात वाढ घडवून आणण्यासाठी वेळोवेळी विविध वित्तीय समावेशन विषयक समित्यांची स्थापना केलेली आहे.

जसे की, सी रंगराजन समिती (2008), नचिकेत मोर समिती (2013), दिपक मोहंती समिती (2015). वरील समित्यांच्या शिफारशीनूसार पुढील योजना सुरु करण्यात आल्या आहेत.

1) **बँक स्वाभिमान योजना**

ही योजना 10 फेब्रुवारी 2011 रोजी सुरु करण्यात आली.

या योजनेचा उद्देश बँक तुमच्या दारी असा असून ग्रामीण गरिंबापर्यंत वित्तीय सेवा पुरविण्यासाठी ही योजना सुरु केली.

2) जनधन योजना

या योजनेची सुरुवात 28 ऑगस्ट 2014 रोजी करण्यात आली.

योजनेचे टप्पे खालील प्रमाणे

1) पहिला टप्पा - 14 ऑगस्ट 2015 पर्यंत

2) दुसरा टप्पा - 15 ऑगस्ट 2015 ते 14 ऑगस्ट 2018

3) तिसरा टप्पा - 15 ऑगस्ट 2018 पासून पुढे

जनधन योजनेचे 06 आधारस्तंभ आहेत.

1)	वैश्विक बँक पोहोच	2)	बँक खाते
3)	वित्तीय साक्षरता कार्यक्रम	4)	पतहमी निधी
5)	सुक्ष्म विमा	6)	असंघटीत क्षेत्रासाठी पेंशन योजना

संशोधनाचे महत्व :-

वित्तीय समावेशनामध्ये जनधन योजनेचे योगदान एक आर्थिक अभ्यास - (विशेष संदर्भ मराठवाडा) या विषयाकरीता संशोधनाचे महत्व म्हणजे ग्रामीण गरीबांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात सुधारणा होण्यासाठी मदत होणार आहे. जनधन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी या संशोधनामुळे फायदा होईल. तसेच वित्तीय समावेशनच्या एकूण कामगिरीचा आढावा घेण्यासाठी मदत होईल.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

1) जनधन योजनेचा अभ्यास करणे.

2) मराठवाड्यातील जनधन योजने अंतर्गत उघडलेल्या बँक खात्यांचा अभ्यास करणे.

3) जनधन योजनेच्या बँक खात्यामुळे बँकेच्या ठेवीमध्ये झालेली वाढ अभ्यासणे.

4) जनधन योजने अंतर्गत महिलांच्या बँक खात्यामध्ये झालेली वाढ अभ्यासणे.

5) जनधन योजनेमुळे सर्वसामांन्याच्या आर्थिक व सामाजिक जीवनमानात झालेला बदल अभ्यासणे.

6) जनधन योजनेमुळे वित्तीय समावेशनाच्या व्याप्तीत आलेली वाढ अभ्यासणे.

7) जनधन योजनेअंतर्गत बँक खातेधारकांना मिळणाऱ्या बँकिंग सोई- सुविधांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके :-

1) जनधन योजनेमुळे बँक खात्यामध्ये वाढ झाली आहे.

2) जनधन योजनेमुळे ग्रामीण भागात बँकांचा विस्तार झाला आहे.

3) जनधन योजनेमुळे लोकांना बचतीची सवय लागली आहे.

4) जनधन योजनेमुळे बँकांच्या ठेवीमध्ये वाढ झाली आहे.

5) जनधन योजनेमुळे महिलांच्या बँक खात्यामध्ये वाढ झाली आहे.

6) जनधन योजनेमुळे खातेधारकांना अधिविकर्ष सवलतीचा लाभ मिळाला आहे.

7) जनधन योजनेमुळे वित्तीय समावेशनात वाढ झाली आहे.

संशोधनाच्या मर्यादा :-

1) प्रस्तूत संशोधनाची मर्यादा ही प्रादेशिक स्तरापर्यंत असणार आहे.

2) संबंधीत संशोधनासाठी नमुना निवड पद्धतीचा वापर केला जाणार आहे.

3) संशोधनासाठीचा कालावधी हा 2018 ते 2023 असा असणार आहे.

संशोधन पद्धती :-

प्रस्तूत संशोधनासाठी तथ्यसंकलनासाठी प्राथमिक व द्वितीय साधन सामग्रीचा वापर करण्यात येणार आहे. द्वितीय साधनसामग्रीमध्ये संदर्भ ग्रथ, पेपर मासिके व शासनाचे विविध प्रकाशित अहवाल याचा वापर करण्यात येणार आहे. तर प्राथमिक माहीती गोळा करण्यासाठी प्रश्नावलीचा, मुलाखतीचा वापर प्रत्यक्ष तथ्यसंकलनात करण्यात येणार आहे.

प्रस्तूत संशोधनाच्या विषय व्यापक असल्याने प्राथमिक माहीती गोळा करतांना नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

यामध्ये जनधन योजनेचे लाभार्थी निवडतांना प्रत्येक जिल्ह्यातून 70 लाभार्थ्यांच्या निवड सहेतूक नमुना निवड पद्धतीद्वारे करण्यात येणार आहे. मराठवाड्यात एकूण 8 जिल्हे आहेत. त्यातील 560 जनधनयोजनेचे बँक खातेधारक अभ्यासासाठी निवडण्यात येणार आहेत.

प्रकरणाची रुपरेषा :-

1) **प्रकरण पहिले** :- **प्रस्तावना**

प्रस्तूत प्रकरणामध्ये संशोधन विषयाशी संबंधीत असणारी माहिती अभ्यासली जाणार आहे.

2) **प्रकरण दुसरे** :- **मराठवाड्याची पार्श्वभूमी**

प्रस्तूत प्रकरणामध्ये मराठवाडा या प्रदेशाचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतीक, पार्श्वभूमी अभ्यासली जाणार आहे.

3) **प्रकरण तिसरे** :- **मराठवाड्यातील जनधन योजनेअंतर्गत वित्तीय समावेशकता**

मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील विविध बँकांमध्ये जनधन खातेधारकामध्ये झालेली वाढ व जनधन योजनेमुळे बँक खात्यातील ठेवी मध्ये झालेली वाढ अभ्यासणे.

4) **प्रकरण चौथे** :- **जनधन योजनेतील खातेधारकांची आर्थिक व सामाजिक स्थिती**

या योजनेमुळे लोकांच्या उत्पनात झालेली वाढ अभ्यासणे, तसेच लोकांची शैक्षणिक व सामाजिक प्रगती अभ्यासली जाणार आहे सोबतच राहणीमानातील झालेला बदल अभ्यासणे.

5) **प्रकरण पाचवे** :- **निष्कर्ष व शिफारशी**

या प्रकरणामध्ये संशोधनाचे निष्कर्ष व शिफारशींचा आढावा घेण्यात येणार आहे.

संदर्भसुची :-

1) **संशोधन पद्धती** :- प्रदिप आगलावे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

2) **संशोधन पद्धती** :- डॉ.सुधीर बोधनकर, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

3) **वित्तीय समावेशन अहवाल** (2022) :- रिझर्व बँक ऑफ इंडिया (RBI)

4) **भारतीय बँक व्यवसाय प्रणाली** - डॉ. आर. के. दातीर, जी.जे. लोमटे, निराली प्रकाशन

संशोधक

प्रसाद एकनाथराव कदम

एम.ए., सेट (अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.बाभुळगावकर किशन एस.

अर्थशास्त्र विभाग

श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय, वसमत